# पोलीस आयुक्तालय,
## मिरा-भाईंदर,वसई-विरार
सेक्टर-५, शांतीगार्डन, मिरारोड(पूर्व),जि.ठाणे ४०११०७
Phone No.022-29451003,
Email ID- cpoffice.mb-vv@mahapolice.gov.in


जा.क्र.पोआ/मिभावव/आस्था-१/ पोना ते पोहवा/पदोन्नती/ ३२ / २०२२ दिनांक ०५/०७/२०२२

**संदर्भ** :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि.०१/०८/२०१९

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी -२०१८/प्र.क्र.३६६/ १६-ब, दि.०७/०५/२०२१

३. आदेश क्र.पोआ/मिभाववि/आस्था-१/पोना ते पोहवा/पदोन्नती/७६/२०२२, दि. १५/०३/२०२२

**विषय** :- पदोन्नतीबाबत.

-------ooo--------

**आदेश:-**

मिरा-भाईदर, वसई विरार आयुक्तालयाचे आस्थापनेवरील पोलीस अंमलदारांना संदर्भ क्रमांक ३ अन्वये पोलीस हवालदार पदात पदोन्नती देण्यांत आली आहे. सदर वेळी खालील नमुद पोलीस अंमलदार यांना संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र नसल्याने पोहवा पदात पदोन्नती देण्यात आली नव्हती.

२. नमूद पोलीस अंमलदार **दि.१५/०३/२०२२** नंतर संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाले असुन त्यांनी संगणक अर्हता उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर आहे.सदर अंमलदारांची पदोन्नतीसाठी केलेल्या पुनःपडळणीत ते पदोन्नतीसाठी पात्र ठरले आहेत. सबब महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. बीसीसी/२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ मधील निर्देशानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ मधील निर्णयाच्या अधिन राहून खालील नमूद पोलीस नाईक यांना दि.२५/०४/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेच्या स्थितीनुसार **पोलीस हवालदार** (वेतन स्तर एस-०९ मधील रु.२६४००- रु.९३६००) या पदावर प्रत्यक्ष कार्यभार स्विकारल्या दिनांकापासून **निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती** देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदाराचे नाव | नेमणूक |
|---|---|---|
| १ | पोना/३०५६ सुदाम शिवाजी शेळके | नयानगर पोस्टे |
| २ | पोना/६११८ सचिन सिद्राम दोरकर | वालीव पोस्टे |
| ३ | पोना/०६१५१ रुस्तम हरि राटोड | वालीव पोस्टे |
| ४ | मपोना/०७०७२ प्रिया धिरज राणे/साळवी | वालीव पोस्टे |

३. **सबंधीत प्रभारी अधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र.वशिअ/१२१४/प्र.क्र.५२(२)/११, दि.१७/११/२०१४ परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे पदोन्नती दिलेल्या पोलीस अमंलदार यांनी मार्च-२०२२ अखेर पावेतोची मत्ता व दायित्वाची विवरणपत्रे सादर केल्याची पडताळणी करुन किंवा सादर केल्यानंतरच त्यांना पदोन्नती स्विकारण्यास परवानगी द्यावी.**

४. सबंधित पोलीस अंमलदार यांनी पदोन्नती स्विकारल्याचा दिनांक स्टेशन डायरी नोंदीसह सबंधित प्रभारी अधिकारी यांनी तात्काळ इकडील कार्यालयास कळवावा. तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेल्या अमंलदारांपैकी जे अमंलदार सध्या रुग्णनिवेदन रजेवर/अर्जित रजेवर अशा अमंलदारांनी ते कर्तव्यावर हजर झाले दिनांकापासुन पदोन्नती देण्यात येवून तसे या कार्यालयात कळवावे.

५.  उपरोक्त नमूद अंमलदारांना दिलेली पदोन्नती ही मा. सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारने दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचीका क्र. २८३०६/२०१७ चे अंती निर्णयाचे अधिन राहून देण्यात येत आहे. सबब सदर तात्पुरत्या पदोन्नतीमुळे सबंधित अमंलदार यांना नियमीत पदोन्नतीचे, म्हणजेच सेवाजेष्टतेचे कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाहीत. तद्नंतर शासनाकडील सुधारीत निर्णयानुसार याची सर्व सबंधीत पोलीस अमंलदार यांनी नोंद घ्यावी.

६.  सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ अन्वये निर्गमीत शासन निर्णयात काही सुधारीत सुचना प्राप्त झाल्यास पदोन्नत झालेले पदाची निवडसुची तसेच, जेष्टतासुची सुधारीत झाल्यास पदोन्नत होणाऱ्या पोलीस अमंलदार यांचे जेष्ठतासुची मधील स्थानात बदल अथवा पदावनत होणे या बाबी उद्भवू शकतात याची नोंद घ्यावी.

७.  उक्त नमूद तात्पुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असेलेल्या अंमलदार यांचेविरुध्द आता गुन्हा दाखल झाला असल्यास अथवा निलंबनाची कारवाई केली असेल, न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील, तर सबंधीत प्रभारी अधिकारी यांनी त्यांना पदोन्नतीच्या पदावर कार्यभार स्विकारण्यास परवानगी न देता त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी.

८.  पदोन्नती देण्यात आलेल्या वरील कोणत्याही पोलीस अमंलदार यांनी पदोन्नती स्विकारण्यास नकार दिल्यास सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र.एसआरव्हि/२०१५/प्र.क्र.३०३/का-१२, दि.१२/०९/२०१६ अन्वये त्यांना पदोन्नतीचा हक्क गमवावा लागेल. तसेच पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या निवड यादीतून त्यांचे नाव काढून टाकण्यात येवून पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसूची मध्ये त्यांचा पदोन्नतीसाट विचार न करता तिसऱ्या वर्षीच्या निवडसूचीत पदोन्नतीसाठी पात्रता तपासण्यात येईल, याची समज सबंधीत पोलीस अमंलदार यांना देण्यात यावी. पदोन्नती नाकारलेल्या पोलीस अमंलदार यांचे अर्ज घेऊन संबधीत प्रभारी अधिकारी यांनी या कार्यालयास तात्काळ सादर करावयाचे आहेत.

९.  पदोन्नत अमंलदार यांनी पदोन्नती न स्विकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र.एसआरव्हि/ ७१०८७/३१११/ प्र.क्र.११/८९/१२, दि.३०/०४/२०२१ मधील आदेशानुसार त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल. तसेच अशा अमंलदारांना कालबध्द पदोन्नती/सेवांतर्गत अश्वासीत प्रगती योजना/सुधारी सेवांतर्गत अश्वासीत प्रगती योजनेचा पहिला/दुसरा व तीसरा लाभ मंजूर करण्यात आला असल्यास, वित्त विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३, दि.२३/०९/२०१५ मधील तरतुदीनुसार सदरचा लाभ काढून घेण्यात येईल. मात्र दिलेल्या लाभांची वसूली करण्यात येणार नाही.

१०.  उक्त आदेशामधील या घटकातील जे प्रतिनियुक्तीवर अमंलदार आहेत, त्यांना मुंबई पोलीस नियमावली भाग-१ (प्रशासन) नियम ८० अन्वये नियमानुसार पदोन्नती देण्यात आली असून , सदर पोलीस अमंलदार यांनी पदोन्नती पदाचा कार्यभार स्विकारल्याचा दिनांक या कार्यालयास विनाविलंब कळवावा. प्रतिनियुक्ती ठिकाणी पदोन्नती स्विकारलेले पद रिक्त नसल्यास व त्यांनी पदोन्नती नाकारल्यास त्याबाबतची माहिती या कार्यालयास प्रतिनियुक्ती घटक प्रमुखांनी सत्वर कळवावी.

**११.  महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२०१९ (अधिसूचना )दिनांक ३० जानेवारी २०१९ मधील नियम १० नूसार १ जानेवारी किंवा १ जुलै या पैकी एकाच दिनांकास वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय आहे. तसेच २ जानेवारी आणि १ जुलै (दोन्ही दिवस धरुन ) या कालावधीत पदोन्ती झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यास पुढील वर्षाच्या १ जोनवारी रोजी वेतनवाढ देय आहे. आणि २ जुलै आणि १ जानेवारी (दोन्ही दिवस धरुन ) या कालावधी पदोन्नत झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यास पुढील वर्षाच्या १ जुलै रोजी वेतनवाढ देय आहे. सदर तरतुदी विचारात**

**घेता नमूद आदेशान्वये पदोन्नती मिळालेल्या पोलीस अंमलदार यांना त्यांच्या वेतनवाढ दिनांक विचारात घेवून शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पीअेचवा/१०८२/सीआर/११००(२)अेसईआर-३, दि.६/११/१९८४ अन्वये पदोन्नती पदात कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो सदर आदेश निर्गमित दिनांकापासुन १ महीन्याचे आत द्यावा. मुदतीत विकल्प सादर न केल्यास पदोन्नती तारखेस म.ना.सेवा (वेतन)नियम, ११ (१)(अ) नुसार पदोन्नती पदावर वेतन निश्चिती करण्यात येईल. याबाबत सर्व संबधीत पोलीस अंमलदार यांनी नोंद घ्यावी.**

**पदोन्नती मिळालेल्या सर्व पोलीस अमंलदार यांचे अभिनंदन व त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.**

**(विजयकांत सागर)**
**पोलीस उप आयुक्त,**
**मिरा-भाईंदर,वसई-विरार**

**प्रति,**

सर्व संबधीत पोलीस अंमलदार, मि.भा.व.वि.

**प्रत-** पोलीस उप आयुक्त परिमंडळ १,२ व ३ / पोलीस उप आयुक्त गुन्हे शाखा, मि.भा.व.वि
सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.
सर्व प्रभारी पोलीस निरीक्षक पो.स्टे / शाखा प्रभारी अधीकारी मि.भा.व.वि.
राखीव पोलीस उप निरीक्षक / पोलीस निरीक्षक नि.कक्ष / मपोशा,मि.भा.व.वि.

**प्रत-** कार्यालय अधीक्षक, लेखा शाखा / इ- पत्रक प्रसिध्दीसाठी

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**
मा. पोलीस आयुक्त मि.भा.व.वि.
मा. अपर पोलीस आयुक्त मि.भा.व.वि.